# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी—५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

(महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभाग)

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली — ४४२६०५ E-Mail : college.section@unigug.ac.in


गो.वि./म.वि.वि. वि./४५५/२०२४ दिनांक: ०५/०३/२०२४

अत्यंत महत्वाचे/

## परिपत्रक

विषय :—महाविद्यालयातील अध्यापकांच्या करिअर ॲडव्हान्समेंट स्किम अंतर्गत (कॅस) प्रस्ताव सादर करण्याबाबत.

संदर्भ :—१. उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे दिनांक ८ मार्च २०१९ च्या शासन निर्णय

२.विद्यापीठाचे पत्र क्रमांक गों. वि./म. वि./१६७/२०१९ दिनांक १७/१२/२०१९

३. विद्यापीठाचे पत्र क्रमांक गों. वि./म. वि. वि. वि./२९१४ दिनांक २५/०७/२०२२.

४. गोंडवाना विद्यापीठ यंग टिचर्स असोशिएशन यांचे पत्र क्रमांक ७२/२०२४ दिनांक २८/०२/२०२४

५. दिनांक ०४/०३/२०२४ रोजीची मा. अधिष्ठाता मंडळाची सभेतील निर्णयानुसार.

विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांना कळविण्यात येते कि, संदर्भीय क्रमांक २ व ३ च्या परिपत्रकान्वये महाविद्यालयातील अध्यापकांचे करिअर ॲडव्हान्समेंट स्किम (कॅस) बाबतची प्रकरणे महाविद्यालयांकडुन विनाविलंब निकाली काढण्याबाबत सुचित करण्यात आले आहे. तथापी महाविद्यालयातील अध्यापकांचे करिअर ॲडव्हान्समेंट स्किम (कॅस) अंतर्गत स्थाननिश्चितीबाबत महाविद्यालय स्तरावर प्रलंबित असलेल्या प्रस्तावावर तात्काळ कार्यवाही घेऊन सदर प्रस्ताव विद्यापीठात सादर करावे. तसेच संदर्भ क्रमांक १ च्या शासन निर्णयातील ७.३ (I) नुसार स्थाननिश्चितीचा प्रस्ताव ३ महिण्यापुर्वी विद्यापीठात सादर करण्याबाबत नमुद केलेले आहे. त्या अनुषंगाने सदर महाविद्यालयाने अध्यापकांचे स्थाननिश्चितीचा प्रस्ताव ३ महिण्यापुर्वी विद्यापीठात सादर करावे, जेणेकरुन विद्यापीठाकडुन नियमानुसार समिती गठीत करण्याबाबतची कार्यवाही घेणे सोईचे होईल.

जे महाविद्यालय अध्यापकांच्या प्रलंबित करिअर ॲडव्हान्समेंट स्किम (कॅस) बाबत स्थाननिश्चिती समिती गठीत करण्याबाबतचे प्रस्ताव विद्यापीठात सादर करणार नाही अशा महाविद्यालयांवर/संस्थेवर विद्यापीठाकडुन तसेच शासनाकडुन कार्यवाही झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्थेचे अध्यक्ष/सचिव व प्राचार्य यांची राहिल याची नोंद घ्यावी.

मा. प्र—कुलगुरु यांच्या आदेशानुसार

०५/०३/२०२४

( रविंद्र पी. जुनघरी )
सहाय्यक कुलसचिव (प्र)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

प्रति,

मा. अध्यक्ष/सचिव/प्राचार्य
सर्व संलग्नित महाविद्यालये
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

प्रतिलीपी:—

१. मा. कुलगुरु महोदय, यांचे स्विय सहायक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र—कुलगुरु यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. कुलसचिव यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.